अनाथांसाठी राज्यस्तरीय सल्लागार समिती गठीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०२०/प्र.क्र.७७/का-०३
नवीन प्रशासन भवन, तिसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक- ०३ फेब्रुवारी, २०२१.

वाचा :-१. शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्र.अमुजा-२०११/प्र.क्र.२१२/का.०३, दि.०२.०४.२०१८.

२. शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्र.अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का.०३, दि.२०.८.२०१९.

**प्रस्तावना :-**

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ अन्वये काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या अनाथ, निराधार बालकांना संस्थेतून बाहेर पडल्यानंतर जातीचा दाखला नसल्यामुळे विविध शासकीय लाभापासून वंचित रहावे लागते त्यामुळे अनाथ मुलांना राज्य शासनाच्या विविध सवलतींचा लाभ घेता यावा याकरिता अनाथांना उपरोक्त वाचा क्र.१ व २ मधील तरतूदीनुसार शिक्षण व नोकरीमध्ये खुल्या प्रवर्गामध्ये १% समांतर आरक्षण देण्यात आलेले आहे. तथापि, अनाथ मुलांच्या विविध शैक्षणिक, सामाजिक,आर्थिक अडचणीबाबत चर्चा करून त्यावर निर्णय घेणेसाठी कोणतीही स्वतंत्र समिती/यंत्रणा सद्यस्थितीत अस्तित्वात नाही.सबब,अनाथ मुलांच्या विविध अडचणींवर चर्चा करून त्यानुषंगाने उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने अनाथांसाठी राज्यस्तरीय सल्लागार समिती गठीत करण्यात यावी, असे निदेश मा.राज्यमंत्री(महिला व बाल विकास) यांनी दिनांक ११.२.२०२० रोजी आयोजित विभागाच्या आढावा बैठकीत दिले होते.त्यानुसार अनाथ मुलांच्या विविध समस्यांवर चर्चा व उपाययोजना करणेच्या अनुषंगाने अनाथ मुलांचा समावेश असणारी राज्यस्तरीय समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

उपरोक्त पार्श्वभूमीच्या अनुषंगाने, अनाथ मुलांच्या विविध शैक्षणिक, सामाजिक,आर्थिक अडचणींबाबत चर्चा करून त्यावर निर्णय घेणेसाठी राज्यस्तरीय अनाथ सल्लागार समिती गठीत करण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.सदरील समितीची रचना व कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील-

**१.समितीची रचना-**

| | | |
|---|---|---|
| १ | सचिव, महिला व बाल विकास विभाग,मंत्रालय,मुंबई. | अध्यक्ष |
| २. | आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे | सदस्य |
| ३. | उप सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई. | सदस्य |
| ४. | १.श्री.आदित्य चरेगावकर(देवनार,मुंबई)-अनाथ प्रतिनिधी<br>२.श्रीम.अमृता प्रणय करवंदे(सदाशिव पेठ,पुणे)- अनाथ प्रतिनिधी<br>३.श्री.अर्जुन बट्टू चावला(घणसोली,नवी मुंबई)- अनाथ प्रतिनिधी<br>४.श्री.संजय श्रावण पंडीत(औरंगाबाद)- अनाथ प्रतिनिधी<br>५.कु.गौरी किसान कागुणे(अमरावती)- अनाथ प्रतिनिधी<br>६.श्री.जावेद शेख युसुफ शेख(नागपूर)- अनाथ प्रतिनिधी<br>७.श्री.अभय तेली(मुंबई)- अनाथ प्रतिनिधी<br>८.श्रीम.सुलक्षणा आहेर(नाशिक)- अनाथ प्रतिनिधी | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| | ९.श्री.अमीत वासनीक (अमरावती)- अनाथ प्रतिनिधी<br>१०.श्री.नारायण इंगळे (औरंगाबाद)- अनाथ प्रतिनिधी | |
| ५. | विशेष आमंत्रित | सदस्य |
| ६. | उपायुक्त (बाल विकास), महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे. | सदस्य-सचिव |

२. **समितीची कार्यकक्षा**-अनाथ मुलांच्या विविध प्रश्न, समस्या व उपाययोजना याबाबत गठीत करण्यात येत असलेल्या राज्यस्तरीय समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील-

१) अनाथ मुलांच्या आरक्षणासंबंधीत समस्येवर चर्चा व उपाययोजना करणे.

२) बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम,२०१५ च्या कार्यकक्षेत येणारी अनाथ विशेषत: मुली वयाच्या १८ व्या वर्षानंतर संस्थेतून बाहेर पडल्यानंतर त्यांना येणा-या समस्या.

३) अनाथांसाठी राबविण्यात येणा-या विविध योजना व धोरण यांच्या अंमलबजावणीसंबंधीत बाबी.

४) अनाथ मुलांना स्वयंसेवी संस्थांमार्फत रोजगार प्रशिक्षण,कौशल्य विकासाच्या योजनांचा लाभ मिळावा यासाठी उपाययोजना.

उपरोक्त नमूद राज्यस्तरीय सल्लागार समितीची तिमाही बैठक आयोजित करण्यात यावी.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२१०२०३१७०२००९३३० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAVINDRA SITARAM JARANDE

(र. सि. जरांडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री/मा.उप मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य
२. सर्व मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
३. मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा/विधानपरिषद, महाराष्ट्र राज्य
४. सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
५. सर्व मंत्रालयीन विभाग
६. संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
७. सचिव, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, वरळी, मुंबई
८. आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे
९. सर्व उप सचिव/ अवर सचिव/ कक्ष अधिकारी, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१०. सर्व विभागीय महिला व बाल विकास अधिकारी,
११. सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी
१२. श्री.आदित्य चरेगावकर(देवनार,मुंबई)
१३. श्रीम.अमृता प्रणय करवंदे(सदाशिव पेठ,पुणे)
१४. श्री.अर्जुन वट्टू चावला(घणसोली,नवी मुंबई)
१५. श्री.संजय श्रावण पंडीत(औरंगाबाद)

१.र्सा



१६. कु.गौरी किसान कामुणे (अमरावती)
१७. श्री.जावेद शेख युसुफ शेख (नागपूर)
१८. श्री.अभय तेली (मुंबई)
१९. श्रीम.सुलक्षणा आहेर (नाशिक)
२०. श्री.अमीत वासनीक (अमरावती)
२१. श्री.नारायण इंगळे (औरंगाबाद)
२२. निवड नस्ती, का-०३.